आरती विश्वनाथ बाबांची १

रचना : श्री. रमेश रहाटे

ओवाळू आरती दयाळा, श्री विश्वनाथ स्वामी
तुझा श्री विश्वनाथ स्वामी
नागनाथ तू मच्छिंद्र सुत तव, जन्म अयोनि ॥ धृ. ॥

वाहे चरणी काटेपूर्णा, पुष्पोदक वाहिनी
दुमदुमतो घाट एकसारखा, दत्तनाम वचनी
पंचप्राण मम पाजळुनि हे, ठेऊनि निरंजनी
भक्तीने आरती राऊळी, आलो घेऊनि
मंदावती फुलवाती, भवभये, पळती बावरुनि
ज्योत वाढवी, प्रेमाची ती, धार वरी धरुनि ॥ १ ॥ श्रीपाळ

श्याम सावळे पण, तुझेच चिंतन, मूर्ती तव नयनी
विश्वनाथ तू, तूच माउली, दिनांची या भुवनी
सत्यरुप तव मजसी दावूनि, भवरोगा नाशुनि
जीवन फुलवी त्वरे पाव गा, कृपास्त धरुनि ॥ २ ॥

नाथ गोरक्ष विश्वनाथा, करितसे विनवणी
दिन लेकरु तुझे मी देवा, सत्वरी ये धावूनि
नाथांचा तू नाथ दयाळा, दे मज मूळ जाणूनि
भाव जडू दे मला एकची, ने मज तव चरणी ॥ ३ ॥

ओवाळू आरती दयाळा, श्री विश्वनाथ स्वामी,
तुझा श्री विश्वनाथ स्वामी
नागनाथ तू, मच्छिंद्र सुत, तव जन्म अयोनि ॥